महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. पीआर-३ / कॉस / ०७१८५** **दिनांक : ०९.०३.२०१०**

# वाणिज्य परिपत्रक क्र. - १११

**विषय :-** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००५ मधील भाग ८.४ नुसार ग्राहक तपासणी लॉग बुक नोंदी अद्ययावत ठेवणेबाबत.

**संदर्भ :-** उप दक्षता अधिकारी (अंमल) यांचे कार्यालयीन टिप्पणी क्र. दंवसु/अंमल/लॉग बुक नोंदी/८८ दिनांक २०.०१.२०१०.

महावितरण कंपनीमध्ये दक्षता व सुरक्षा संचालनालयाच्या अखत्यारित एकुण ४० फिरते पथके आणि संचलन व सुव्यवस्था विभागातर्फे एकुण १४० स्थानिक फिरती पथके कार्यरत आहेत. महावितरण कंपनीची मोठया प्रमाणात होणारी विजेची हानी कमी करण्यासाठी घरगुती, व्यापारी, औद्योगिक व शेती या ग्राहकांमार्फत ठिकठिकाणी होणा-या वीज चोरीला आळा घालणे हे फिरत्या पथकांचे मुख्य उद्देश आहे. घरगुती, व्यापारी, औद्यागिक व शेती या वर्गातील ग्राहक मिटरमध्ये फेरफार करणे, मिटरमध्ये रेझीस्टन्स टाकणे, रिमोटव्दारे मिटर चालु व बंद करणे, मीटर वाचन बंद करणे, तथापि, अनधिकृत वीज वापर अथवा मंजुर वीज वापरात हेतुत: बदल करुन अशा प्रकारे वीजेची चोरी करणा-या संबंधित ग्राहकांविरुध्द तपासणी अंती आढळून आलेल्या निष्कर्षाच्या आधारे विद्युत कायदा २००३ चा सुधारित कायदा २००७ मधील कलम १२६,१३५ व १३८ नुसार कायदेशीर कारवाई संबंधित फिरत्या पथकांमार्फत व सं व सु अंतर्गत स्थानिक फिरत्या पथकांमार्फत करण्यात येते.

विद्युत कायदा २००३ चा सुधारित वीज कायदा २००७ मधील कलम १२६, १३५ व १३८ नुसार वीज चोरी व अनाधिकृत वीज वापर करणा-या संबंधित ग्राहकांविरुध्द वरील प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई होण्यासाठी संबंधित विद्युत इन्स्पेक्टर व स्पेशल कोर्ट यांचे कडे प्रकरण दाखल करण्यात आलेले आहेत. परंतु स्पेशल कोर्ट व विद्युत इन्स्पेक्टर तर्फे संबंधित ग्राहकांना प्रत्यक्षात विद्युत कायदा २००३ चा सुधारित वीज कायदा २००७ मधील कलम १२६ व १३५ नुसार केलेली कारवाई लागू असतानाही, वरील प्रकरणी निर्णय देताना केवळ संबंधित तपासणी अधिका-यांने ग्राहकाच्यां जागेची तपासणी बाबतच्या नोंदी योग्यरीत्या लॉग बुकात न करणे या तांत्रिक मुद्दयावर ग्राहकांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे. यामुळे संबंधित ग्राहकाने प्रत्यक्षात वीज चोरी केल्याचे सबळ पुरावे असतानाही फिरत्या पथकांमार्फत दाखल केलेल्या प्रकरणात केवळ " ग्राहकांच्या जागेत जाऊन तपासणी बाबत, लॉग बुकात तपासणी अधिका-याने नोंद न केल्याचा" मुद्दा गृहीत धरुन, वीज चोरीमुळे झालेले महसुली नुकसान वसुलीपासुन कपनीस वंचित ठेवण्यात आल्याचे विद्युत इन्स्पेक्टर व स्पेशल कोर्टाकडून प्राप्त झालेल्या निर्णयावरुन दिसुन आले आहे.

याबाबत वर नमुद केलेल्या केवळ तांत्रिक मुद्दयावरुन विद्युत कायदा २००३ चा सुधारित वीज कायदा २००७ मधील कलम १२६ व १३५ नुसार लागू असलेल्या वीज चोरी व अनाधिकृत वीजेचा वापर प्रकरणात

ग्राहकांची केलेली निर्दोष मुक्तता विचारात घेता, भविष्यात कंपनीचे या प्रकरणी आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तत्परतेने उपाय योजना अंमलात आणणे जरुरीचे आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, विद्युत पुरवठा संहिता आणि इतर अटी, विनियम २००५ मधील भाग क्र. ८.४ नुसार लॉग बुक नोंदी ठेवण्याबाबत फिरती पथके व स्थानिक फिरत्या पथकांनी **"ग्राहकांच्या जागेत भेट देण्यापूर्वी व भेट दिल्यानंतर संबधित अधिका-याने लॉग बुकात करावयाच्या नोंदी "** (Before Visit & After Visit Log Book) बाबत चा नमुना 'अ' तसेच **" ग्राहकांच्या जागेत भेट देताना भेट नोंद बुकात करावयाची नोंदी "** (Consumer Premises Visit Diary) बाबत चा नमुना 'ब'अशा प्रकारे नमुने तयार करण्यात आलेले आहे. शासन अधिसुचनेव्दारे विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ व १३५ च्या उपकलम (२) च्या खंड (अ), (ब) व (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ क्रमशः निर्धारण अधिकारी व शक्तीचा वापर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिका-यांनी सदर लॉग बुक अद्ययावत ठेवावे. विद्युत अधिनियम २००३ च्या विविध कलमाअंतर्गत महावितरण कंपनीच्या अधिका-यांना शक्तीचा वापर करण्याकरीता शासनाने प्रदान केलेल्या अधिकाराबाबतच्या अधिसुचना वाणिज्य परिपत्रक क्र. ४६ दि. १७.१०.२००६ अन्वय सर्व क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत करण्यात आलेले आहे.

सर्व क्षेत्रीय अधिका-यांना याबाबतीत असे सुचित करण्यात येते की, तांत्रिक मुद्दयांवरुन विद्युत कायदा २००३ चा सुधारित कायदा २००७ मधील कलम १२६ व कलम १३५ अन्वये वीज चोरी व अनाधिकृत वीज वापरात सहभाग असलेल्या ग्राहकाची निर्दोष मुक्तता होऊ नये व प्रकरणी महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान टाळण्याकरिता सोबत जोडलेल्या नमुना 'अ' व नमुना 'ब' नुसार लॉग बुक व भेट नोंद बुक यामध्ये काटेकोरपणे नोंदी घेण्यात याव्यात.

**सहपत्र :** नमुना 'अ' व 'ब'

नरेंद्रसिंह नायक

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :-** प्रेषण यादीप्रमाणे

# Log Book

To be kept in custody of incharge of office or officer designated

| Before Visit | | | | | | | After Visit | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| Sr. No | Date & Time | Name of the Officer intending to visit | Area/ particular consumer to be visited | Name of the persons accompanying from office including panch witness,if any | Sign | | Visit diary No. and entry No. in respect of that visit | Whether offence Chapter XII EA detected | Whether unauthorised use U/s 126 EA is noticed | Brief Summary of report | Further action proposed/ taken | Remarks | Sign |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

# CONSUMERS PREMISES VISIT DIARY

| Sr. No. | Date | Name,& Design of Visiting Officer | Name of consumer & Consumer No. & Address | Time In | Name of Person Present at the Time Entry in Consumer Premises | Signature of Person present at the Time of Entry | Brief Results of inspection | Time Out | Sign of Visiting Officer |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |